ePaper
| वर्ष - 6 । अंक - 361 | UDYAM-MH-26-0158827 |
महाईन्यूज (TM)
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!
www.mahaenews.com | । शुक्रवार दि. 21 एप्रिल 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## मराठा आरक्षण: सुप्रीम कोर्टाकडून राज्य सरकारला धक्का




### आतील पानांत


- दादा, आम्ही सदैव तुमच्यासोबत!
- बेकायदा होर्डिंगवर 'बुलडोझर'!
- राज्य शासनाला धक्का!


# उद्योगनगरी बोले तो 'ब्युटीफुल'!

## प्रशासनाचा अभिनंदनीय कामगिरी : राज्य सरकारचा तृतीय क्रमांकाचा पुरस्कार

। पिंपरी। महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**नगरविकास दिनानिमित्त महाराष्ट्र शासनामार्फत शहर सौंदर्यीकरण व नागरी प्रशासनातील विविध बाबींमध्ये उत्तम कामगिरी करणा-या स्थानिक स्वराज्य संस्थांना आज राज्याचे माननीय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले. यामध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेला राज्यातील अ व ब महानगरपालिकांच्या गटामध्ये तिसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार प्राप्त झाला आहे. हा पुरस्कार महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह यांनी आज स्विकारला. ५ कोटी रुपये रोख आणि प्रशस्तीपत्रक असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.**






मुंबई येथे संपन्न झालेल्या या समारंभास महानगरपालिकेच्या वतीने अतिरिक्त आयुक्त जितेंद्र वाघ, सह शहर अभियंता प्रमोद ओंभासे, मनोज सेठिया, उप आयुक्त रविकिरण घोडके, कार्यकारी अभियंता प्रेरणा सिनकर, प्रशासन अधिकारी तथा स्वच्छ सर्वेक्षण समन्वयक सोनम देशमुख आदी उपस्थित होते. या यशाबद्दल महानगरपालिकेचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. आयुक्त शेखर सिंह यांच्या नेतृत्वाखाली प्रशासकीय गतिमानता साधून दर्जेदार विकास कामे आणि उपक्रम राबविण्याकडे महानगरपालिकेने भर दिला आहे. महानगरपालिकेचा झालेला हा सन्मान खऱ्या अर्थाने शहरवासियांचा सन्मान असून त्यांच्या सक्रिय सहभागामुळेच हे यश प्राप्त झाले आहे, अशी भावना आयुक्त शेखर सिंह यांनी यावेळी व्यक्त केली. यामध्ये लोकप्रतिनिधी, नागरिक, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध संस्थांचा महत्वाचा वाटा आहे. सामुहिक प्रयत्न आणि नागरी सहभागामुळे या शहराला जागतिक दर्जाचे शहर बनवणे शक्य आहे, असे मत आयुक्त सिंह यांनी व्यक्त केले.

### जागतिक दर्जाचे शहर बनवणे शक्य...

**» गतवर्षी देखील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेला राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियान स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांकाचा पुरस्कार मिळाला आहे. शहरवासियांच्या गरजा आणि भविष्यात करावयाच्या आवश्यक सेवासुविधांचा सर्वकष विचार करून महानगरपालिकेच्या वतीने विविध विकास प्रकल्प, उपक्रम आणि योजना राबविल्या जात आहेत.**

# आयपीएल सट्टेबाजांच्या मुसक्या आवळल्या!

## लोणावळ्यात पाचजण ताब्यात : पुणे ग्रामीण पोलिसांची कारवाई

। पिंपरी। महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

आयपीएल मॅचवर सट्टा घेणाऱ्या पाच जणांवर लोणावळ्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांच्याकडून एक लॅपटॉप, काही मोबाईल संच व टिव्ही असा साधारणतः 1 लाख 57 हजारांचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला आहे. पुणे ग्रामीणच्या स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी)



लोणावळ्यातील एका बंगल्यात ही कारवाई केली.

याप्रकरणी पुणे ग्रामीण एलसीबीचे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक प्रकाश वाघमारे यांनी लोणावळा शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

या फिर्यादीवरून राजविनसिंग मनजितसिंग बांगा (वय 27, क्लब व्यवसाय, रा. वडाळा ट्रक टर्मिनल, मुंबई), मस्कीनसिंग रजेद्रसिंग अरोरा (वय 30, क्लब व्यवसाय रा पंजाबी कॉलनी, सायन कोळीवाडा), शशांक महाराणा (रा. प्रतिक्षानगर सायन ईस्ट), ईफ्तेकार ऊर्फ इमरान खान (पुर्ण नाव व पत्ता माहित नाही), षेन्टी (पुर्ण नाव माहित नाही) रा. सायन ईस्ट कोळीवाडा यांच्यावर भादवं कलम 420, 465, महाराष्ट्र जुगार कायदा कलम 4(अ),भारतीय टेलिग्राफ अँक्ट कलम 25(क) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### तुंगाली भागातील बंगल्यात लावला सापळा...

**» राजस्थान रॉयल विरुद्ध लखनऊ जाएंट या सवाई मानसिंग स्टेडियम जयपुर येथे सुरु असलेल्या आयपीएल टी - 20 सामन्यावर काही जण एका खाजगी बंगल्यात बसून बेटिंग घेत असल्याची गुप्त माहिती पुणे ग्रामीणच्या एलसीबी पथकाला मिळाल्यानंतर या पथकाने तुंगार्ली भागातील सदर बंगल्याजवळ सापळा लावत बुधवारी रात्री छापा मारला असता हा प्रकार समोर आला. आत बंगल्यामध्ये वरील सर्वजण वेगवेगळ्या नावाने घेतलेल्या विविध मोबाइी सिमच्या माध्यमातून काही अँप्लिकेशनचा वापर करत लॅपटॉपवर बेटिंग घेत असताना मिळून आले.**

# दादा, आम्ही सदैव तुमच्यासोबत!

## » पिंपरीत NCP च्या माजी नगरसेवकाने भरचौकात लावला फ्लेक्स

।पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

महाराष्ट्राचे राजकारण गेल्या काही दिवसांपासून विधानसभेचे विरोधीपक्ष नेते अजित पवार यांच्याभोवती फिरताना दिसत आहे. अजित पवार राष्ट्रवादी सोडणार असल्याच्या चर्चांना उधाण आले होते. मात्र स्वतः अजित पवार यांनी याबाबत माध्यमांशी संवाद साधून आपण मरेपर्यंत राष्ट्रवादीतच राहणार असल्याचे ठणकावून सांगितले. तरीही या विषयावरुन उडालेला धुरळा अद्याप खाली बसल्याचे दिसत नाही. कारण पिंपरी चिंचवड शहरात "दादा तुमच्या सोबत" असे फ्लेक्स सध्या चर्चेचा विषय होऊ लागले आहेत. या फ्लेक्सवर राष्ट्रवादीच्या नावाचा आणि चिन्हाचा कुठलाही उल्लेख नसल्याने चर्चा वाढू लागल्या आहेत.




राष्ट्रवादीचे माजी नगरसेवक मोरेश्वर भोंडवे यांनी हे फ्लेक्स लावले आहे. फ्लेक्सवर राष्ट्रवादीचा उल्लेख टाळल्याचे पहायला मिळत आहे. दोन दिवसांपूर्वी राष्ट्रवादीचे पिंपरीचे आमदार अण्णा बनसोडे यांनी अजित पवार जो निर्णय घेतील तो मान्य असल्याचे जाहीररित्या सांगितले होते. त्यामुळे पिंपरी चिंचवडचे राजकारण देखील वेगळ्या दिशेने जाताना पहायला मिळत आहे.

अजित पवार आपले नियोजित कार्यक्रम रद्द करून एकदम गायब झाले होते. त्यानंतर अनेक चर्चांना उधाण आले होते. त्यामुळे सर्वच संभ्रमात असल्याचे पहायला मिळत होते. राष्ट्रवादीत फूट पडण्याची स्थिती निर्माण झाली होती. मात्र अजित पवारांनी त्यावर पडदा टाकत विषय संपवण्याचा प्रयत्न केला. मात्र पिंपरी चिंचवडमध्ये लागलेले हे फ्लेक्स वेगळेच संकेत देता आल्याचे बोलले जात आहे.

### फ्लेक्स चर्चेचा विषय...

» आमदार अण्णा बनसोडे यांच्यानंतर आता स्थानिक नगरसेवक देखील अजित पवार यांना जाहीर पाठिंबा देत असल्याचे पहायला मिळत आहे. त्यामुळे राष्ट्रवादीत अजूनही धुसफूस असल्याचे पहायला मिळत आहे. त्यामुळे "दादा तुमच्यासोबत" हे फ्लेक्स चर्चेचा विषय ठरत आहे.

# पुणेकर सुट्टीवर अन् चोरटे 'कामा' वर !

## » सदनिकांचे कुलूप तोडून लाखो रुपयांची घरफोडी करून चोरट्यांनी घातला धुमाकूळ

।पुणे ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

उन्हाळ्याच्या सुट्टीनिमित्त पुणेकर फिरण्यासाठी बाहेरगावी जात असताना शहरात चोरटे सक्रिय झाले आहेत. शहरात वेगवेगळ्या भागात चोरीच्या घटना घडल्या आहेत. नरवीर तानाजी मालुसरे रस्त्यावरील (सिंहगड रस्ता) आनंदनगर येथे चोरट्यांनी पाच सदनिका फोडल्या. सदनिकांचे कुलूप तोडून लाखो रुपयांची घरफोडी करून चोरट्यांनी धुमाकूळ घातला. घरफोडीबरोबरच सोनसाखळी व मोबाइल हिसकावण्याच्या घटनाही वाढल्या आहेत.



**आनंदनगरात पाच फ्लॅट फोडले**

आनंदनगर भागात चोरट्यांनी पाच सदनिकांचे कुलूप तोडून ऐवज लांबविला. याबाबत आनंदनगर भागातील दत्त सोसायटीतील एका ज्येष्ठ महिलेने सिंहगड रस्ता पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार महिला सदनिका बंद करून बाहेर गेल्या होत्या. चोरट्याने तक्रारदाराच्या सदनिकेचे कुलूप तोडून सोने-चांदीचे दागिने, रक्कम असा सव्वा चार लाख रुपयांचा ऐवज लांबविला. आनंदनगर भागातील कापरे गार्डन सोसायटीतील चार सदनिकांचे कुलूप तोडून चोरी करण्याचा प्रयत्न केला.

मात्र, सदनिकेतून नेमका किती ऐवज लांबविण्यात आला, याबाबतची माहिती मिळू शकली नाही. सदनिका मालकांनी अद्याप पोलिसांकडे तक्रार दिलेली नाही.

**बँकेतून एक लाख लांबवले**

बँकेत पैसे भरणा करण्यासाठी गेलेल्या महिलेकडील एक लाख रुपयांवर चोरट्याने डल्ला मारला. या प्रकरणी हडपसर येथील महिलेने लष्कर पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. तक्रारदार महिला व पती कॅम्प येथील महात्मा गांधी रस्त्यावरील सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या शाखेत गेल्या होत्या. त्या वेळी चोरट्याने बँक कर्मचारी असल्याची बतावणी केली आणि त्यांच्याकडे पॅनकार्ड मागितले. महिलेचा पती पॅनकार्डची झेरॉक्स काढण्यासाठी बाहेर गेला असता, चोरट्याने त्या महिलेला पैसे भरण्याचा अर्ज आणण्यास पाठवले.

त्याच काळात त्याने महिलेकडील रक्कम घेतले आणि भरणा केंद्रात ठेवल्याचे सांगत पोबारा केला. बँकेतच अशाप्रकारे चोरी झाल्याने गोंधळ उडाला. संबंधित व्यक्ती बँकेची कर्मचारी नसल्याचे स्पष्ट झाल्याने महिलेने पोलिसांत तक्रार दिली. पोलिस उपनिरीक्षक मनीषा वलसे तपास करीत आहेत.

### पाच लाखांचा ऐवज लंपास

» नाना पेठेतील भुसार बाजार परिसरात एका दुकानाचे कुलूप तोडून चोरट्यांनी पाच लाख रुपयांचे सिगारेटची पाकिटे चोरून नेली. याबाबत सुरेश चौधरी यांनी समर्थ पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. चौधरी यांचे नाना पेठेत जय अंबे ट्रेडर्स दुकान आहे. चोरट्यांनी मध्यरात्री दुकानाच्या लोखंडी दरवाज्याचे कुलूप उचकटले. चोरट्यांनी दुकानात प्रवेश करून पाच लाख नऊ हजार रुपयांची सिगारेटची पाकिटे ठेवलेली खोकी चोरून नेली.

### मार्केट यार्डात दुकान फोडले

» मार्केट यार्ड येथील किराणा दुकानाचे शटर उचकटून चोरट्यांनी दोन लाख रुपये लंपास केले. याबाबत एका व्यावसायिकाने मार्केट यार्ड पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. व्यावसायिकाचे भगवती किराणा दुकान बंद असताना दोघा चोरट्यांनी दुकानाचे शटर उचकटून आत प्रवेश केला. कपाटात ठेवलेली दोन लाखांची रक्कम घेऊन चोरटे पसार झाले.

# बेकायदा होर्डिंगवर ‘बुलडोझर’!

## » महापालिका प्रशासनाची कारवाई : शहरात सर्वेक्षण सुरू, मालकांची उडाली धांदल

।पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**किवळे येथील घटनेत पाच जणांचा बळी गेल्यानंतर अनधिकृत होर्डिंग काढण्याबाबत महापालिकेला जाग आली आहे. शहरात सर्वेक्षण सुरू केले आहे. गेल्या दोन दिवसांत ६५ अनधिकृत होर्डिंग आढळले असून, ते काढण्याची कारवाई सुरू केली आहे. न्यायप्रविष्ट ३३४ होर्डिंग वगळून अन्य सर्व होर्डिंग व किऑक्स काढून टाकण्यात येणार आहेत. त्यामुळे होर्डिंग मालकांची अक्षरश: धांदल उडाली आहे.**

देहूरोड-कात्रज बाह्यवळण मार्गावर किवळे येथे सोमवारी अनधिकृत होर्डिंग कोसळून पाच जणांचा मृत्यू झाला व तीन जण जखमी झाले आहेत. त्यानंतर शहरातील होर्डिंगचा विषय चव्हाट्यावर आला. महापालिका प्रशासक शेखर सिंह यांनी होर्डिंगचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच, आकाश चिन्ह परवाना विभागाचे सहायक आयुक्त प्रशांत जोशी रजेवर असल्याने तात्पुरता अतिरिक्त कारभार सहायक आयुक्त नीलेश देशमुख यांच्याकडे दिला आहे. होर्डिंग मालक, जागा मालकांची बैठक घेऊन त्यांना होर्डिंगच्या मजबुतीबाबत आदेश दिले आहेत. शिवाय, अनधिकृत होर्डिंग काढून घ्यावेत, अन्यथा फौजदारी कारवाईचा इशारा दिला आहे.

### होर्डिंगसाठी झाडांची कत्तल

अधिकृत व अनधिकृत होर्डिंग असलेल्या परिसरात वृक्षांची छाटणी केली जात आहे. होर्डिंगवरील जाहिराती दिसाव्यात या साठीच झाडांटी छाटणी केली जात आहे. याबाबत आंगोळीची गोळी संस्थेचे पदाधिकारी तनय पटेकर यांनी वेळोवेळी महापालिकेकडे तक्रार केली आहे. त्यांनुसार होर्डिंगसमोरचीची झाडे छाटली जात आहेत. महापालिका अधिकारी मात्र अज्ञान व्यक्तींनी झाडांची छाटणी केल्याचे सांगतात. याबाबत महापालिका उद्यान विभागाने पोलिसांकडे तक्रार केली असून, त्यात, विनापरवाना वृक्षतोडीबाबत संबंधितांवर झाडांचे संरक्षण व जतन अधिनियमानुसार कारवाई करावी, असे म्हटले आहे.





> शहरातील अधिकृत व अनधिकृत होर्डिंगचे सर्वेक्षण सुरू केले आहे. गेल्या दोन दिवसांत ६५ अनधिकृत होर्डिंग आढळले असून त्यांच्यासह विद्युत खांब, झाडांची खोडे यांवर लावलेले किऑस्क काढून टाकण्याची कारवाई सुरू केली आहे.
>
> - नीलेश देशमुख, सहायक आयुक्त, आकाशचिन्ह परवाना विभाग, महापालिका

### मृतांच्या नातेवाइकांना नोकरीची मागणी

**» किवळे येथे होर्डिंग कोसळून मृत्यूमुखी पडलेल्या मृतांच्या कुटुंबातील सदस्यांस महापालिका सेवेत नोकरी देऊन पुनर्वसन करावे. आकाशचिन्ह व परवाना विभागातील संबंधित अधिकाऱ्यांना सहआरोपी करून सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा तसेच, जखमींना महापालिकेने प्रत्येकी पाच लाख रुपये आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी बहुजन विकास आघाडीचे संस्थापक संजय धुतडमल, प्रदेशाध्यक्ष विजय मोरे, संदीपान झोंबाडे यांनी प्रशासक शेखर सिंह यांच्याकडे केली आहे.**

---

# कौतुकास्पद : आर्यन ग्रुपने जपली सामाजिक बांधिलकी!

## » पोलीस रिलीफ फंडला 25 कोटी, तर मुख्यमंत्री केअर फंडला 51 कोटींची मदत

।मुंबई | ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आपत्कालीन परिस्थितीत यंत्रणांची सज्जता तपासण्यासाठी पिंपरी-चिंचवड अग्निशमन विभागाने मॉकड्रिल केले. बुधवारी (दि. 19) दिवसभरात शहरात दोन ठिकाणी अग्निशमन विभागाचे मॉकड्रिल पार पडले.**

समाजातील निर्नायकी आणि बेबदशाहीला आटोक्यात ठेवण्यात पोलिसांचे महत्वपूर्ण योगदान आहे. तसेच राज्यात कोणत्याही अडचणीत सापडलेल्या व्यक्तीला मुख्यमंत्री केअर फंडातून मदत पोहोचवली जाते, त्यामुळे सामाजिक जाणीव सदोदित बाळगणाऱ्या आर्यन्स ग्रुपच्या वतीने या दोन्ही निधीच्या वाटपात फूल ना फूलाची पाकळी म्हणून 76 कोटी रुपयांचे योगदान देण्यात आले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांनी आर्यन ग्रुपच्या सामाजिक योगदानाचे कौतुक करत उद्योजकांनी अशी सामाजिक जाणीव ठेवली तर समाजाच्या अभ्युदयाला वेळ लागणार नाही, अशी भावना व्यक्त केली. आर्यन्स ग्रुपचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोहर जगताप यांच्या हस्ते पोलीस रिलीफ फंडला 25 कोटी तर मुख्यमंत्री केअर फंडला 51 कोटी रुपयांची मदत आर्यन समुहाच्या वतीने देण्यात आली. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राज्याचे शिक्षणमंत्री दीपक केसरकर, शंभूराजे देसाई



आदी उपस्थित होते.

समाजाचे आपण देणे लागतो. सामाजिक ऋणातून आपण मुक्त व्हायला पाहिजे, ही आर्यन्स ग्रुपची भूमिका आणि विचारधारा आहे. या विचारधारेला अनुसरून आम्ही हे आमचे योगदान देत आहोत. दोन्ही निधी या समाजाचे भले करणाऱ्या आहेत. त्याची जाणीव आम्हाला असल्यामुळे आम्ही त्यात आमचे योगदान देत आहोत.

याआधीही आर्यन्स ग्रुप ऑफ कंपनीज् संचालित ओमा फाउंडेशन तर्फे पुण्यातील सिग्नल्सवर मोफत हेल्मेट वाटप करण्यात आलं होतं. ओमा फाउंडेशन कडून शाळेतील 50 विद्यार्थ्यांना शालेय गणवेश वाटण्यात आले. यामध्ये पाचवी ते सातवी मधील विद्यार्थ्यांचा समावेश होता. ओमा फाउंडेशन तर्फे याआधीही या शाळेला आर्थिक मदत करण्यात आली होती. तसेच कोविड काळात रुग्णालयांमध्ये मोफत व्हेंटिलेटर वाटप देखील करण्यात आले होते. यावर्षी आर्यन्स ग्रुप ऑफ कंपनीज् कडून सांगलीची दिव्यांग गिर्यारोहक काजल दयानंद कांबळे हिला आर्थिक मदत करण्यात आली होती. 8 मार्च 2023 रोजी जागतिक महिला दिनी आफ्रिका खंडातील सर्वोच्च शिखरावरून भारताचा तिरंगा फडकवण्याचं काजलचं स्वप्न पूर्ण करण्यासाठी मदत केली.

तर आत्ता आर्यन्स ग्रुप ऑफ कंपनीज् ने मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी 50 कोटी तर गृहमंत्री खात्यास 25 कोटी अशी रोख रक्कम देणगी स्वरूपात दिले आहे. आर्यन्स ग्रुप एव्हिएशन सेक्टर, एज्युकेशन सेक्टर, फायनान्स, हॉस्पिटलीटी, ग्रीन एनर्जी, हेल्थ केअर, गोल्ड रिफायनरी, पेट्रोकेमिकल्स, फार्मासिटिकल, हेवी इंडस्ट्रीज, ई-वेहिकल, फुड अँड बेवरेज, मीडिया अँड एंटरटेनमेंट, इंफ्रास्ट्रक्चर अँड रिअल इस्टेट आणि एग्रीकल्चर अंड ऑरगॅनिक फार्मिंग या क्षेत्रांमध्ये काम करत आहे.

### मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांकडून कौतुक...

**» मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, समाजाविषयी कृतज्ञता ठेवावी, ही आपल्या संतांची शिकवण आहे. त्याचे आचरण जगताप परिवार आणि आर्यन ग्रुपच्या वतीने केले जात आहे. त्यामुळे समाजाषियी जागरूक असणाऱ्या या समुहाचे मी स्वागत आणि कौतुक करतो. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, दुसऱ्याचे ओरबाडून घ्यावे ही विकृती असते तर स्वत:च्या ताटातील घास गरजवंताला देणे ही संस्कृती आहे. आर्यन ग्रुप आणि जगताप परिवाराचे संस्कृती जपण्याच्या वृत्तीबद्दल मी अभिनंदन करतो.**

## संपादकीय »

# कर्नाटक निवडणुकीत काय होईल?

***देशभरातील राजकारणात प्रचंड चढ-उतार सुरू असतानाच कर्नाटक निवडणुकीचा बिगुल वाजला आहे. राष्ट्रीय राजकारणात एकीकडे राहुल गांधींची भारत जोडो यात्रा आणि त्यांची रद्द झालेली खासदारकी यावर जोरदार चर्चा चालू आहे, तर दुसरीकडे भाजपचे बहुमताचे सरकार असणाऱ्या कर्नाटक विधानसभेची निवडणूक जाहीर झाल्याने संपूर्ण देशाचे लक्ष या निवडणुकीकडे लागले आहे. येत्या १० मे रोजी कर्नाटकमध्ये २२४ जागांसाठी मतदान होईल आणि त्यानंतर १३ मे रोजी कर्नाटकी जनतेचा स्पष्ट कौल काय आहे हे मतमोजणीतून स्पष्ट होईल. कर्नाटक विधानसभेची एकूण सदस्यसंख्या २२४ आहे.***

या मतदान प्रक्रियेमध्ये सहभागी होणाऱ्या ८० हून जास्त वयाच्या मतदारांची संख्या तब्बल १२.१५ लाख इतकी आहे. ही मंडळी कोणाला मतदान करतात यावर निवडणुकीचे भवितव्य अवलंबून असणार आहे. २०१८ साली कर्नाटक विधानसभेचा निकाल त्रिशंकू होता. २००८ सालीदेखील राज्यात कोणालाही बहुमत मिळाले नव्हते. यावेळी निवडणुकीत भाजप आणि काँग्रेस या दोन्ही पक्षात खरी चुरस आहे. मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांनी भाजपला पुन्हा बहुमताने सरकार स्थापन करता येईल, असा दावा केला आहे, तर काँग्रेसचे प्रदेश अध्यक्ष डीके शिवकुमार यांनी काँग्रेस तयार असल्याचे म्हटले आहे. या दोन्ही पक्षात जेडीएसनेदेखील मैदानात दावेदारी ठोकली आहे.

महत्वाचे म्हणजे अनेक ओपिनियन पोल करणाऱ्या संस्थांनी निवडणूक जाहीर होण्यापूर्वीच आपले पोल जाहीर केले आहेत. लोक पोल संस्थेने यंदा सत्तांतराचा अंदाज वर्तवला आहे. या पोलनुसार राज्यात काँग्रेसचा झेंडा विधानसभेवर फडकेल. काँग्रेसला तब्बल ११६ ते १२३ जागा मिळतील, असा अंदाज लावण्यात आला आहे, तर भाजपला ७७ ते ८३ जागा मिळतील, असे लोक पोल सर्व्हेतून दिसते. जेडीएस २१ ते २७ दरम्यान असेल. अपक्ष आणि छोट्या पक्षांच्या वाट्याला १ ते ४ जागा येतील. मतांच्या टक्केवारीचा विचार केल्यास काँग्रेसला ३९ ते ४२ टक्के, भाजपला ३३ ते ३६ टक्के आणि जेडीएसला १५ ते १८ टक्के मते मिळतील. सत्तांतराचा छातीठोकपणे दावा करणाऱ्या लोक पोलने हा सर्व्हे करताना ४५ हजार लोकांची मते विचारात घेतली आहेत. यासाठी ४५ दिवस चाचपणी करण्यात आली. पॉप्युलर पोल्सच्या सर्व्हेनुसार कर्नाटकात सर्वच पक्षांची दमछाक होणार आहे. त्यातून कोणत्याही पक्षाला बहुमत मिळणार नाही.




# महाराष्ट्राची कीर्तन परंपरा!



महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासामध्ये कीर्तन परंपरेचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. किंबहुना कीर्तन संस्था ही महाराष्ट्राचीच नव्हे तर एकुणातच तमाम भारतीयांच्या सांस्कृतिक व आधात्मिक जीवनाचे भरणपोषण करणारे महत्त्वाचे केंद्र आहे. या परंपरेचा उगम थेट प्राचीन पुराणग्रंथात तसेच वैदिक काळातही सापडतो. यावरून या माध्यमाची प्राचीनता व मौलिकता स्पष्ट होते. कीर्तन या शब्दाचे अनेक अर्थ दिसून येतात. स्तवन करणे, स्तुतीस्तोत्र गाणे, गुण वर्णिने किंवा कथीने, हरिदास वगैरे वीणादी गाणसाहित्य घेऊन देवळात परमेश्वराचे उभ्याने गुणवर्णन करतात ते.

इत्यादी अर्थ अग्निपुराण, भारतीय संस्कृती कोश आणि मोल्सवर्थ शब्दकोशात दिलेले आहेत. महर्षी नारदांना या संस्थेचे जनक मानले जाते. त्यामुळेच या व्यासपीठाला नारदाची गादी म्हणण्याचाही प्रघात आहे. वारकरी पंथात कीर्तनाच्या प्रवर्तकाचा मान संत नामदेवांना दिला जातो. नारदीय कीर्तन, वारकरी कीर्तन, रामदासी कीर्तन आणि लोकमान्यांनी सुरू केलेला राष्ट्रीय कीर्तन हा नवा प्रवाह असे कीर्तनाचे विविध प्रकारही पडतात. रंजन व प्रबोधनाचे अत्यंत सुलभ व प्रभावी साधन म्हणजे कीर्तन होय. कीर्तन ही दृकश्राव्य कला आहे.

मौखिक परंपरेने चालत आलेली प्रयोगरूप कला म्हणून कीर्तन या प्रकाराकडे पाहिले जाते. नवविधा भक्तीतील भक्तीचा दुसरा प्रकार म्हणूनही कीर्तनाची ओळख आहे. हे पारमार्थिक अधिष्ठान या कला प्रकाराला लाभल्याने कीर्तनाकडे केवळ भक्तिभावाने पाहिले गेले. त्यामुळे या कलेच्या प्रायोगिक व कलात्मक अंगाकडे दुर्लक्ष झालेले दिसते. कीर्तन हा जसा सामूहिक भक्तीचा एक प्रकार आहे तसाच ती सादरीकरण होणारी नाट्यासारखी प्रायोगिक कला आहे. संगीत, नाट्य नृत्य, साहित्य, वक्तृत्व या कलेचा समन्वय कीर्तनात होतो. तसेच नाटकाप्रमाणे ही कला समूहासमोर प्रत्यक्ष सदर होत असल्याने ही कला अधिक समूहिष्ठ समजली जाते. या संस्थेचे आणखी वैशिष्ठ्ये म्हणजे ज्या काळात कोणत्याही प्रकारचे शिक्षण आणि मुद्रण कलेची सुविधा उपलब्ध नव्हती, त्या काळात लोकशिक्षणाचे व साहित्याच्या प्रसार, प्रचाराचे आणि समाजप्रबोधनाचे, प्रभावी असे कार्य कीर्तन या संस्थेने केले. या दृष्टीने विचार करता कीर्तन ही परंपरा एकाच वेळी पारमार्थिक, रंजनात्मक, प्रबोधनात्मक आणि प्रकाशनात्मक, प्रसारात्मक असे पंचविध कार्य करते. या माध्यमाचे हे अनेकविध पैलू आहेत.

कीर्तनाच्या या बहुविध स्वरुपामुळेच ही कला मराठी साहित्यातील संत, पंत आणि तंत या तिन्ही प्रवाहामध्ये महत्त्वाची मानली गेली. एवढेच नव्हे तर अनेक पंडित व शाहीर कवी हे उत्तम कीर्तनकार होते. कीर्तनाच्या माध्यमातूनच काव्य, शास्त्र व विनोदाचा विशेषत: संत, पंत, तंत साहित्याचा प्रसार व प्रचार झाला. मनोरंजनासह जीवनमूल्यांचा प्रसार करणारे कीर्तनासारखे दुसरे प्रभावी, लोकप्रिय आणि आदर्श माध्यम नाही. पौराणिकतेपासून राष्ट्रीयत्वापर्यंतचा पैस कीर्तन संस्थेने व्यापलेला दिसून येतो. कीर्तनाच्या या कलात्मक आणि समाजाभिमुखतेमुळेच अनेक सुधारक संतांनी कीर्तनाच्या माध्यमातून जनजागृतीचे आणि आत्मजागृतीचे कार्य केले.

'नाचू कीर्तनाच्या रंगी। ज्ञानदीप लावू जागी।, अशी प्रतिज्ञा करून संत नामदेवांनी आत्मजागृतीचे, भागवत धर्माचे प्रसाराचे कार्य केले, तर संत गाडगेबाबांनी या कीर्तनाला संवादात्मक रूप देऊन समाज जागृतीचे कार्य केले. यावरून ह्या कलेचे महात्म्य लक्षात येते. अनेक थोर विचारवंतांनी कीर्तन परंपरेचा मुक्तकंठाने गौरव केला आहे. यासंदर्भात लोकमान्य टिळकांनी म्हटले आहे, 'मी पत्रकार झालो नसतो तर कीर्तनकार झालो असतो.'

# परदेशगमनाचा अट्टहास का?

**नोकरी वा शिक्षणासाठी भारतातून दरवर्षी २५ लाख नागरिक परदेशी जातात. जगातील विविध प्रगत वा आर्थिक सुबत्ता असलेल्या देशात सध्या किमान सव्वातीन कोटी भारतीय कायमस्वरूपी स्थलांतरित झाले आहेत. परदेशी जाणे वाईट आहे किंवा त्यात काही चूक आहे, असे नव्हे; परंतु तसे करण्यामागील प्रेरणा जर आपल्या देशातील शिक्षण/रोजगार यांच्या दर्जाशी संबंधित असेल, तर त्याचा विचार नक्कीच करायला हवा.**

चालू आठवड्यात एका इंग्रजी वर्तमानपत्रात आलेल्या तीन बातम्या दखल घ्याव्यात अशा आहेत. म्हटले तर त्यांचा परस्परांशी संबंध आहे, नाही तर त्या स्वतंत्र बातम्या आहेत. पहिली बातमी आहे उच्च शिक्षणासाठी भारतातून परदेशी जाणाऱ्या विद्यार्थ्यांबाबतची. परदेशात जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या किती, याची विचारणा एका प्रश्नाद्वारे लोकसभेत केली होती. त्याच्या उत्तरादाखल दिल्या गेलेल्या माहितीनुसार, २०२२ मध्ये परदेशात शिक्षणासाठी गेलेल्या विद्यार्थ्यांची संख्या साडेसात लाखांच्या वर आहे. गेल्या चार वर्षांतील हा उच्चांक आहे. विशेष म्हणजे सरकारकडे, परदेशी गेलेल्या आणि परतलेल्या विद्यार्थ्यांची आणि नागरिकांचीही विशिष्ट अशी वेगळी नोंद नाही. हे लोक जिथे जातात, त्या देशाचा कोणता व्हिसा त्यांना मंजूर झाला आहे किंवा तत्सम माहितीच्या आधारावर ही



आकडेवारी निश्चित केली जाते; तरी ही माहिती केंद्र सरकारने लोकसभेत दिलेली असल्याने ती ग्राह्य धरणे क्रमप्राप्त आहे.

इतक्या मोठ्या संख्येने भारतीय विद्यार्थी 'चांगले' शिक्षण मिळण्यासाठी परदेशी विद्यापीठांमध्ये प्रवेश घेतात. त्यातले बहुतांश भारतात परतत नाहीत, हे काही गुपित नाही. शिवाय दर वर्षी आधीच्या वर्षापेक्षा ही संख्या वाढतच आहे, हेही आकडेवारीवरून दिसून येते. याचा साधा अर्थ असा, की लाखो विद्यार्थ्यांना आपल्या देशातील उच्च शिक्षणाच्या गुणवत्तेपेक्षा इतर देशातील गुणवत्ता अधिक विश्वासार्ह वाटते. ही मुले परत यायला तयार होत नाहीत, याचा आणखी एक साधा अर्थ असा, की त्यांच्याकडे जी गुणवत्ता/कौशल्य/अर्हता आहे, त्याला अनुरूप करिअरची किंवा आर्थिक स्वरूपातील संधी आपल्या देशात नाही. ती संधी असती तर परदेशात शिक्षण पूर्ण झाल्यावर मुले मायभूमीत परतली असती. म्हणजे गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि आर्थिक सुस्थैर्य दोन्ही आघाड्यांवर आपल्या देशापेक्षा त्यांना दुसरे देश अधिक योग्य वाटत आहेत.

दुसरी बातमी आकाराने छोटी आहे; पण आशयाने पहिलीशी संबंधित आहे. कॅनडाने मार्च महिन्यात तीन वेळा एक्स्प्रेस एन्ट्री ड्रॉ काढला आणि विविध देशांच्या २१ हजार व्यक्तींना कायमस्वरूपी निवासी परवाने देण्यात आले. त्याआधी जानेवारीत अशा प्रकारच्या ३२ हजार अर्जांची छाननी करण्यात आली होती.

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# राज्य शासनाला धक्का!

## मराठा आरक्षणाची पुनर्विचार याचिका सुप्रीम कोर्टाने फेटाळली

।मुंबई ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्य सरकारने सुप्रीम कोर्टामध्ये पुनर्विचार याचिका दाखल केली होती. मराठा आरक्षण रद्द झाल्यानंतर ही याचिका दाखल करण्यात आलेली होती. राज्य सरकारची याचिका सुप्रीम कोर्टाने फेटाळली असून हा सरकारला धक्का समजला जात आहे.**



दरम्यान राज्य सरकारने आरक्षणाच्या समर्थनार्थ जोरदार भूमिका मांडावी, असे आवाहन याचिकाकर्ते विनोद पाटील यांनी केले होते. महाराष्ट्र सरकारने २०१९ मध्ये मराठा समाजाला एसईबीसी हे आरक्षण लागू केले होते.

या आरक्षणाविरोधात वकिल गुणरत्न सदावर्ते यांच्या पत्नी जयश्री पाटील यांनी दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणीअंती सर्वोच्च न्यायालयाने आरक्षण रद्द करण्याचा निर्णय दिला होता. याचिका दाखल केली त्यावेळी संभाजीराजे म्हणाले होते की, मराठा समाजाच्या आरक्षणाबाबत राज्यातील सत्ताधारी व विरोधक एकमेकांवर आरोप करून जबाबदारी ढकलतं आहे.

परंतू आता मराठा समाजाला त्याच्याशी काही देणे घेणे नाही. आम्हाला कोर्टाच्या निकालावर मार्ग काय काढणार ते सांगा अशी स्पष्ट ताकीद दिली आहे. न्यायालयाने पुनर्विचार याचिका फेटाळून लावल्यानंतर माजी मुख्यमंत्री व काँग्रेस नेते अशोक चव्हाण यांनी प्रतिक्रिया दिली. ट्वीट करत अशोक चव्हाण म्हणाले, "माननीय सर्वोच्च न्यायालयाने एसईबीसी आरक्षणप्रकरणी फेरविचार याचिका फेटाळण्याचा निर्णय मराठा समाजासाठी दुर्दैवी आहे.

### आरक्षणाचा विषय गांभीर्याने घेतला नाही- पाटील

**» दुर्दैवाने सर्वोच्च न्यायालयाने याचिका फेटाळली. पुन्हा जैसे-थे परिस्थिती निर्माण झाली आहे. मराठा समाजाने चार मुख्यमंत्री बघितले. मात्र कुठल्याच सरकारने मराठा आरक्षणाचा विषय गांभीर्याने घेतला नाही. त्यामुळे ही वेळ आली आहे. अशी प्रतिक्रिया मराठा आरक्षण आंदोलनाचे समन्वयक विनोद पाटील यांनी दिली आहे.**

## गौतम अदाणी शरद पवार यांच्यात बंद दाराआड दोन तास चर्चा! तपशील गुलदस्त्यात!

।मुंबई ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।



अदाणी समुहाचे सर्वेसर्वा गौतम अदाणी आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अध्यक्ष शरद पवार या दोघांचीही शरद पवार यांच्या सिल्वर ओक या बंगल्यावर भेट झाली आहे. या दोघांमध्ये बंददाराआड दोन तास चर्चा झाली. या चर्चेचा तपशील अत्यंत गोपनीय ठेवण्यात आला आहे.

मात्र गेल्या काही दिवसांमध्ये घडलेल्या घडामोडी पाहता या भेटीला अनन्यसाधारण महत्त्व आलं आहे यात काहीही शंका नाही. आज सकाळी १० वाजून १० मिनिटांनी गौतम अदाणी हे आपल्या काळ्या रंगाच्या कारमधून सिल्वर ओक या शरद पवार यांच्या निवासस्थानी आले. त्यानंतर बंद दाराआड या दोघांमध्ये चर्चा झाली.

गौतम अदाणी यांनी २० हजार कोटींचा भ्रष्टाचार केला असा हिंडेनबर्गचा अहवाल आल्यानंतर खळबळ माजली होती. हिवाळी अधिवेशनात राजकीय वातावरण तापलं होतं. मात्र काही दिवसांपूर्वीच शरद पवार यांनी हिंडेनबर्ग हे नाव आपण ऐकलं नाही असं म्हटलं होतं. तसंच जेपीसी ऐवजी सर्वोच्च न्यायालयाची समिती या प्रकरणात योग्य असेल असंही म्हटलं होतं. त्या सगळ्या पार्श्वभूमीवर गौतम अदाणी आणि शरद पवार यांच्यात झालेली भेट सूचक आहे. शरद पवार आणि गौतम अदाणी यांच्यात नेमकी काय चर्चा झाली याबाबत अदाणी किंवा शरद पवार यांच्याकडून काहीही तपशील समोर आलेला नाही. शरद पवार आणि गौतम अदाणी हे एकमेकांना भेटले तेव्हा त्या ठिकाणी कुणीही इतर उपस्थित नव्हते.

# राज्यातील शाळांना आजपासून उन्हाळी सुट्टी जाहीर!

## शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांची घोषणा, अभ्यासक्रम उरकण्याच्या सूचना

। मुंबई ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

राज्यातील सर्व शाळांना (२१ एप्रिल) सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. शिक्षण विभागाकडून सुट्टीबाबतचा शासन निर्णय जाहीर करण्यात आला आहे. वाढत्या तापमानामुळं लवकर सुट्ट्या देण्याचा निर्णय शासनाकडून घेण्यात आला आहे. शिक्षण विभागाच्या माहितीनुसार, प्राथमिक, माध्यमिक तसेच उच्च माध्यमिक अशा सर्वच शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. राज्य शिक्षण मंडळाच्या सर्व शाळांना उद्या २१ एप्रिलपासून उन्हाळी सुट्टी जाहीर करण्याची घोषणा आज शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी केली. ज्या शाळांचा अभ्यासक्रम सुरू आहे, त्यांनी सकाळच्या सत्रात आपले अभ्यासक्रम उरकावेत, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

राज्यात यापूर्वीच जाहीर केल्याप्रमाणे शाळा १५ जूनला उर्वरित महाराष्ट्र आणि ३० जूनला विदर्भातील शाळा सुरू होतील, असेही केसरकर यांनी स्पष्ट केले. ज्या शाळांमध्ये अधिकचे वर्ग घेतले जात आहेत अथवा ॲक्टिव्हिटी केल्या जात आहेत, त्यांनी त्या दुपारच्या सत्रात न करता सकाळच्या सत्रात कराव्यात. नववी-दहावी वगळता इतर वर्गातील मुलांना बोलवता येणार नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांवर या काळात अभ्यासाचा बोजा ठेवू नये. अभ्यासाचे कुठलेही इतर कार्यक्रम देऊ नयेत, असेही केसरकर म्हणाले. दहावीच्या वगळून इतर सर्व मुलांनी सुटीचा आनंद घ्यावा. उन्हाचा जबर तडाखा असल्याने या



कालावधीत इतर काही शिकायचे असेल, तर त्यांनी काळजी घ्यावी, असे आवाहन केसरकर यांनी स्पष्ट केले.

**समन्वयाचा अभाव**

उन्हाळी सुटीवरून शिक्षणमंत्री आणि विभागातील समन्वय पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. आजच प्राथमिक शिक्षण संचालनालय पुणे येथून प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांची उन्हाळी सुट्टी आणि शैक्षणिक वर्ष २०२३-२४ च्या नियोजनाबाबत परिपत्रक जारी करण्यात आले. यात २ मे ते १४ जूनपर्यंत उन्हाळी सुट्टी देऊन १५ जूनपासून शाळा सुरू करण्यात येतील; तसेच जूनमधील विदर्भाचे तापमान विचारात घेता ३० जूनपासून तेथील शाळा सुरू होतील, अशा सूचना जारी करण्यात आल्या आहेत. यापूर्वी माध्यमिक शिक्षण संचालकांकडून विदर्भ वगळता राज्यातील शाळा १२ जून रोजी; तर विदर्भातील शाळा २६ जून रोजी सुरू करण्याविषयीचे परिपत्रक काढण्यात आले होते; मात्र आता शिक्षण मंत्र्यांनीच सुट्टी जाहीर केल्याने समन्वयाचा अभाव समोर आला आहे.

### शाळा सकाळच्या सत्रात भरवा!

**» राज्यातील पालक संघटनांनी वाढत्या तापमानामुळे केंद्रीय मंडळाच्या शाळा सकाळच्या सत्रात सुरू ठेवाव्यात, अशी मागणी शिक्षणमंत्र्यांकडे केली आहे; तर राज्यात सीबीएसई शाळा १० मेपर्यंत सुरू राहणार असून त्यानंतर उन्हाळ्याच्या सुट्या विद्यार्थ्यांना दिल्या जाणार आहेत. शाळा १० मेपर्यंत सुरू ठेवताना त्या सकाळच्या सत्रात भरवल्या जाव्यात, अशी पालकांची मागणी आहे.**

### खारघर घटनेची पार्श्वभूमी

**» नवी मुंबईत काही दिवसांपूर्वी खारघर येथे झालेल्या उष्माघाताच्या दुर्घटनेत १४ जणांचा मृत्यू झाला होता, तर दुसरीकडे विदर्भ आणि मराठवाड्यातही उष्णतेचा कहर सुरू असल्याने शालेय शिक्षणमंत्र्यांनी या घटनेची गंभीर दखल घेत उन्हाळी सुट्टी आज जाहीर केली आहे.**

# पैसे वाटपाचा कार्यक्रम जीवावर बेतला!

## लोकांची विक्रमी गर्दी, चेंगराचेंगरीत 85 जण मृत्यूमुखी

। साना महाईन्यूज ।

**यमनची राजधानी साना येथे एक भीषण दुर्घटना घडली आहे. एका कार्यक्रमादरम्यान झालेल्या चेंगराचेंगरीत ८५ जणांचा मृत्यू झाला आहे. तर १०० हून अधिक जण जखमी झाले आहेत. हुतीतील एका अधिकाऱ्यांनी ही माहिती दिली आहे. अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, ओल्ड सिटीत व्यापाऱ्यांकडून गरिबांना आर्थिक मदत देण्याकरता एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मात्र, या कार्यक्रमात शेकडो गरीब लोक सहभागी झाले आणि एकच गोंधळ निर्माण झाला व चेंगराचेंगरीची स्थिती निर्माण झाली. त्यात ८५ जणांचा मृत्यू झाला आहे.**

ज्या ठिकाणी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते त्या शाळेत प्रवेशबंदी करण्यात आली आहे. तसंच, दोन आयोजकांना ताब्यात घेतलं आहे. तिथे असलेल्या काही प्रत्यक्षदर्शींच्या म्हणण्यानुसार, गर्दीवर नियंत्रण मिळवण्यासाठी हवेत गोळीबार करण्यात आला होता. मात्र गोळी एका विजेच्या तारेला लागली त्यामुळं मोठा विस्फोट झाला. त्यामुळं तिथे जमलेल्या लोकांमध्ये गोंधळ निर्माण झाला, असं काही लोकांनी म्हटलं आहे.

सोशल मीडियावर शेअर होत असलेल्या व्हिडिओमध्ये एका मोठ्या परिसरात मृतदेह जमीनीवर पडलेले दिसत आहे. तर आजूबाजूला लोक आक्रोश करताना दिसत आहे.



# मोठी डिग्री अन् घसरती पात्रता

## येत्या काळात बेरोजगारीचा स्फोट होणार? रिपोर्टमध्ये धक्कादायक खुलासा

। कर्नाटक ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**देशात 50 टक्के असे तरुण आहेत ज्यांच्याकडे नोकरी करण्यासाठी लागणारं स्किल नाही, कौशल्य नाही. INDIAS SKILLS 2023, म्हणजेच हा या वर्षाचा रिपोर्ट आहे आणि हा रिपोर्ट व्ही बॉक्स नावाच्या एका कंपनीने तयार केलाय. हा रिपोर्ट तयार करण्याआधी भारतातील 3 लाख 75 हजार विद्यार्थ्यांची एक टेस्ट घेतली गेली. या टेस्टनंतर तयार करण्यात आलेल्या या रिपोर्टनुसार, भारतात 50 टक्के तरुण असे आहेत जे नोकरीच्या योग्य नाहीयेत.**

आपल्या देशात विरोधी पक्षात असणाऱ्या सर्वच नेत्यांना ज्या एका महत्वाच्या विषयाची खूप काळजी असते. तसचं, भारतात मागच्या 75 वर्षांपासून उचलून धरलेला एक विषय म्हणजे बेरोजगारी. आज आपण त्याचं बेरोजगारीवर बोलणार आहोत. आपल्या देशातील बेरोजगारीमागचं एक महत्वाचं कारणं आपण या व्हिडिओच्या माध्यमातून जाणून घेणार आहोत.

समोर आलेल्या एका माहितीनुसार, देशात 50 टक्के असे तरुण आहेत ज्यांच्याकडे नोकरी करण्यासाठी लागणारं स्किल नाही, कौशल्य नाही. INDIAS SKILLS 2023, म्हणजेच हा या वर्षाचा रिपोर्ट आहे आणि हा रिपोर्ट व्ही बॉक्स नावाच्या एका कंपनीने तयार केलाय. हा रिपोर्ट तयार करण्याआधी भारतातील 3 लाख 75 हजार विद्यार्थ्यांची एक टेस्ट घेतली गेली. या टेस्टनंतर तयार करण्यात आलेल्या या रिपोर्टनुसार, भारतात 50 टक्के तरुण असे आहेत जे नोकरीच्या योग्य नाहीयेत. यात असे तरुण जास्त आहेत ज्याच्याकडे GRADUATE आणि POSTGRADUATE ची DEGREE आहे. या रिपोर्टमधली दुसरी गोष्ट अशी की येत्या काही वर्षांत भारतात GRADUATION केलेले 50 टक्के तरुण असे असणार आहेत. जे नोकरी करण्यासाठी अयोग्य असतील. तसंच तिसरी आणि महत्वाची बाब म्हणजे भारतातील ज्या तरुणांकडे MBA ची DEGREE य त्यातील 40 टक्के तरुण हे नोकरीच्या योग्य नाहीत. कारण हे तरुण UNSKILLED आहेत. तसंच ज्या तरुणांकडे इंजिनीरिंगची DEGREE आहे ते 43 टक्के BCOM ची DEGREE असणारे 40 टक्के आणि ज्यांच्याकडे BSC ची DEGREE आहे असे 63 टक्के तरुण, तसंच ITI मधून डिप्लोमा आणि दुसरे कोर्स करणाऱ्या तरुणांमध्ये 66 टक्के, POLITECNIC ची DEGREE असणारे 72 टक्के, BECHALOR ऑफ PHARAMA DEGREE असणारे 43 टक्के तरुण असे आहेत जे नोकरी करण्यासाठी योग्य नाहीत, नोकरी करण्यासाठी लागणारं कौशल्य त्यांच्याजवळ नाही. म्हणजे या तरुणांकडे DEGREE तर आहे पण योग्यता नाही. आज भारतात बेरोजगारी दर सर्वाधिक 8 टक्के आहे. आणि याचं महत्वाचं कारण म्हणजे आपल्या देशात तरुणांकडे DEGREE तर आहेत पण त्यांना त्या क्षेत्रातील ज्ञानच नाही आहे.



या रिपोर्टमध्ये असही नमूद करण्यात आलंय की पुरुषांच्या तुलनेत शिकलेल्या स्त्रिया नोकरी करण्यासाठी अधिक योग्य आहेत, असं असूनही आपल्या देशात महिलांना नोकरी मिळत नाही. 2022 मध्ये केवळ 47 टक्केच पुरुष नोकरी करण्यासाठी योग्य होते तर त्या तुलनेत 54 टक्के महिला नोकरीसाठी योग्य होत्या. असं असूनही 67 टक्के पुरुषांना नोकऱ्या मिळाल्या आणि केवळ 33 टक्के महिलांना 2022 मध्ये नोकऱ्या देण्यात आल्या.

या रिपोर्टमध्ये UNICEF च्या एका लेखाचा उल्लेख करण्यात आला आहे त्यानुसार भारताच्या LABOUR MARKET मध्ये काम करणारे साडे पाच करोड तरुण हे GRADUATE आहेत. या रिपोर्टमध्ये असं सांगण्यात आलयं की भारतात अशा तरुणांची संख्या 2030 पर्यंत 30 करोड होईल ज्यांचं शिक्षण 10 हून अधिक असेल. परंतु या तरुणांमध्ये BASIC स्किल्स नसणारेत त्यामुळे या तरुणांना भविष्यात नोकरी मिळणार नाही. भारतात तरुणांची संख्या सर्वाधिक आहे. त्यामुळे तरुणांनी आपलं भविष्य सुरक्षित करण्यासाठी शिक्षण घेत असतानाच दुसरे काही SKILLS शिकण गरजेचं आहे जे भविष्यात उपयोगी आहेत.

### जबाबदार कोण?

» भारतातील या वाढत्या बेरोजगारीच्या समस्येवर तुम्हाला काय वाटतं, देशातील शिक्षणव्यवस्था याला जबाबदार आहे? सरकार जबाबदार आहे ते मोठमोठे COLLEGES जबाबदार आहेत जे FEES तर खूप घेतात पण शिक्षण मात्र देत नाहीत की याला ते तरुण जबाबदार आहेत जे शिक्षण मिळत असूनही योग्यरित्या ग्रहण करत नाहीत. समोर आलेल्या या धक्कादायक माहितीमुळे येत्या काळात देशात बेरोजगारीचा विस्फोट होण्याची शक्यता आहे.

# गेट टुगेदर' चित्रपटाचा टीजर लाँच!!



शालेय किंवा कॉलेज जीवनात एखाद्या मुलावर किंवा मुलीवर प्रेम असतं. पण काही ना काही कारणानं ते प्रेम यशस्वी होत नाही. या पहिल्या प्रेमाची पुन्हा आठवण करून देण्याचा प्रयत्न "गेट टुगेदर" या चित्रपटात करण्यात आला आहे. या चित्रपटाचा नॉस्टेल्जिक करणारा टीजर नुकताच लाँच करण्यात असून, उत्तम स्टारकास्ट या चित्रपटात पाहायला मिळणार आहे. येत्या १९ मे पासून संपूर्ण महाराष्ट्रात हा चित्रपट प्रदर्शीत होणार आहे.

सतनाम फिल्म्स प्रस्तुत गेट टुगेदर या चित्रपटाची निर्मिती समीर गोंजारी, संजय गोंजारी, आशिष धोत्रे यांनी केली आहे. चित्रपटाची पटकथा, लेखन आणि दिग्दर्शन सचिन धोत्रे, तर कथा आणि संवाद लेखन प्रवीण कुचेकर यांचे आहे. अजय रणपिसे यांनी चित्रपटाला संगीत दिलं असून सुप्रसिद्ध गायक शंकर महादेवन, जावेद अली गायिका आर्या आंबेकर, प्रियांका बर्वे यांनी चित्रपटातली सुमधुर गाणी गायली आहेत.

"देवमाणूस" या गाजलेल्या मालिकेतील एकनाथ गिते, अँटमगिरी, वाघेऱ्या अशा चित्रपटात काम केलेली श्रेया पासलकर, पुण्यश्लोक अहिल्याबाई या मालिकेतील त्रिशा कमलाकर यांच्या या चित्रपटात प्रमुख भूमिका आहेत. पावसाळी वातावरणात एकांतात असलेलं जोडपं टीजरमध्ये दिसतं आणि पहिल्या प्रेमाची आठवण करून देणाऱ्या संवाद ऐकू येतो. चित्रपटाचा टीजर रोमँटिक असल्यानं या चित्रपटाविषयी आता उत्सुकता वाढली आहे.

# ममता कुलकर्णी, मॉडेल,अभिनेत्री ते ड्रग रॅकेट

२० एप्रिल १९७२ रोजी मतता कुलकर्णी हिचा जन्म मुंबईतील एका सामान्य परिवारात झाला. एकेदिवसी ममताच्या आईने वृत्तपत्रातील एक जाहिरात पाहिली आणि त्यात असे लिहिले होते की, मॉडलिंग एजेंसीसाठी एक नवा चेहरा शोधत आहेत. त्यावेळी मतता ही शाळेत होती. जेव्हा ती घरी आली तेव्हा आईने विचारले की, तुला मॉडलिंग करायची आहे का? तेव्हा तिने म्हटले पाहूयात. पुढे लगेच आईने ठिक आहे असे म्हणत तु तयार रहा आपण अॅड एजेंसीकडे जात असल्याचे म्हटले. ममताने त्या एजेंसीमध्ये गेली आणि त्यानंतर तिला सातत्याने मॉडलिंगसाठी ऑफर मिळू लागल्या होत्या.


मॉडलिंग नंतर ममताला साउथ सिनेमांमध्ये काम मिळू लागले होते. तिचा पहिला सिनेमा ननबारगल (१९९१) होता. मेरा दिल तेरे लिए (१९९१) मध्ये ममता दिसून आली आणि सातत्याने पुढे तिला काही सिनेमे ही मिळाले. सुनील शेट्टी, अक्षय कुमार, सैफ अली खान, सनी देओल सारख्या मोठ्या कलाकारांसोबत काम करताना तिच्याकडे काही सिनेमा होते. परंतु तिला कधीच टॉप एक्ट्रेसेसच्या लिस्टमध्ये स्थान मिळाले नव्हते.

ममताच्या करियर मधील सर्वाधिक चर्चित सिनेमे आशिक आवारा (१९९३), करण अर्जुन (१९९५), सबसे बडा खिलाडी (१९९५), आंदोलन (१९९५), बाजी (१९९६), चाइना गेट (१९९८) होते.

हैदराबादमध्ये ममता कुलकर्णीचे मंदिर १९९२ मध्ये ममता कुलकर्णी ही सिनेमा प्रेम शिकारम मध्ये दिसून आली होती. ज्याने बॉक्स ऑफिसचे सर्व रेकॉर्ड ब्रेक केले होते. साउथमध्ये ममताच्या चाहत्यांची संख्या



# बलोच सिनेमातील 'आस खुळी' प्रेमगीत प्रदर्शित




मराठ्यांची शौर्यगाथा सांगणारा 'बलोच' या चित्रपटाविषयी अनेकांच्या मनात उत्सुकता आहे. अंगावर शहारा आणणाऱ्या टिझरनंतर या चित्रपटातील पहिले प्रेमगीत संगीतप्रेमींच्या भेटीला आले आहे. 'आस खुळी' असे या गाण्याचे बोल असून या श्रवणीय गाण्याला श्रेया घोषाल हिने स्वरबद्ध केले आहे. तर मनातील भावना अभिव्यक्त करणाऱ्या या सुमधुर गाण्याला गुरु ठाकूर यांचे शब्द लाभले असून नरेंद्र भिडे यांनी संगीत दिले आहे.

यापूर्वी प्रदर्शित झालेल्या 'बलोच'च्या पोस्टर, टीझरमध्ये प्रवीण तरडे एका लढवय्याच्या रूपात दिसत आहेत. तर या गाण्यात त्यांची एक वेगळीच बाजू पाहायला मिळत आहे. तर स्मिता गोंदकरही या गाण्यातून पहिल्यांदाच अशा अंदाजात दिसत आहे. प्रवीण तरडे आणि स्मिता गोंदकर यांच्यावर चित्रित करण्यात आलेल्या प्रेमगीतात नजरेतून प्रेमाच्या तरल भावना व्यक्त होत असून मिश्र भावनांचं सुरेख गुंफण दिसत आहे.

नवरा-बायकोमधील विलक्षण प्रेम मनाला भावणारे आहे. एकाच वेळी आपल्या योद्धा नवऱ्याला खंबीर पाठिंबा देत असतानाच स्वारीवर जाण्यासाठी सज्ज झालेल्या आपल्या नवऱ्याला निरोप देताना अस्वथ झालेली पत्नीही पाहायला मिळत आहे. त्यामुळे या चित्रपटात प्रेमकथाही पाहायला मिळणार आहे.चित्रपटाबद्दल दिग्दर्शक प्रकाश जनार्दन पवार म्हणतात, "बलोच चित्रपटातील पहिलं प्रेमगीत प्रदर्शित झालं आहे. हे गाणं खूपच श्रवणीय असून श्रेया घोषाल यांच्या आवाजानं या गाण्याला चारचाँद लागले आहेत. आपल्या राष्ट्रासाठी लढणाऱ्या लढवय्याचे एक कुटुंबही असते, ज्यांना मागे सोडून ते राष्ट्रासाठी आपले प्राण पणाला लावतात. हे एक संवेदनशील प्रेमगीत आहे. युद्धभूमीत लढणारे योध्ये जेवढे महत्वाचे असतात तितकीच घरी वाट पाहणारी त्यांची पत्नीही महत्वाची असते. त्यांचा पाठिंब्याशिवाय हे होणं शक्य नाही'.

# इरफान खान पुन्हा पडद्यावर दिसणार

खानने भले या जगाला अलविदा केले असले तरीही तो चाहत्यांच्या मनात घर करुन गेलायं. अभिनेत्याने आपल्या सिनेमांमधून चाहत्यांच्या मनावर आपली छाप सोडली आहे. अशातच इरफानच्या चाहत्यांसाठी बातमी आहे. कारण इरफानचा अखेरचा आंतरराष्ट्रीय स्तरावरील सिनेमा 'द सॉन्ग ऑफ स्कॉर्पियन्स' प्रदर्शित होणार आहे.

इरफान खान याला चाहते किती पसंद करतात हे या ट्रेलरमधून खरोखर पहायला मिळतेय. अभिनेत्याचा मुलगा बाबिल खान याने आपल्या इंस्टाग्रामवर शेअर केला आहे. याला एक कॅप्शन ही दिले आहे. याचसोबत त्याने या सिनेमाचा ट्रेलर प्रदर्शित कधी होणार आहे सुद्धा सांगितले आहे. येत्या २८ एप्रिलला हा सिनेमा प्रदर्शित होणार आहे.

खरंतर द सॉन्ग ऑफ स्कॉर्पियन्स सिनेमा हा २०१७ मध्येच प्रदर्शित करण्यात आला होता. तो सिनेमा त्यावेळी ही प्रेक्षकांकडून पसंद केला गेला. मात्र तेव्हा तो Swiss-French-Singaporean आणि राजस्थानी भाषेत तयार करण्यात आला होता. परंतु आता तो हिंदी भाषेत प्रदर्शित करण्यात येणार आहे. सिनेमात इरफान सोबत गोशिफतेह फराहानी, वहीदा रहमान आणि शशांक अरोरा सुद्धा आहे. सिनेमाची कथा नूरा नावाच्या मुलीवर आहे. जी आपल्या आजीकडून प्राचीन हिलिंग आर्ट स्कॉर्पियन सिंगिंग शिकत आहे. इरफान एक उंट विक्री करणारा व्यक्ती दाखवला आहे. ज्याला नूरा हिच्यावर प्रेम जडते.

द सॉन्ग ऑफ स्कॉर्पियन्स इरफान याच्या आयुष्यातील अखेरचा प्रोजेक्ट नव्हे तर खरोखरंच त्याच्या करियरचा हा अखेरचा सिनेमा असणार आहे. २०१९ मध्ये आजारी असताना सुद्धा इरफान अंग्रेजी मीडियमचे शूटिंग करत होता. हा सिनेमा २०२० मध्ये प्रदर्शित करण्यात आला होता. ऑगस्ट २०१७ मध्ये स्वित्झर्लँडच्या ७० व्या लोकार्नो फिल्म फेस्टिव्हलमध्ये सॉन्ग ऑफ स्कॉर्पियन्सचा प्रीमियर झाला होता. तर २९ एप्रिल २०२० रोजी कॅन्सरमुळे इरफानचे निधन झाले.



# हुश्श! अखेर जिंकलो!

## दिल्लीने कोलकातावर चार विकेट्सने आयपीएलमधील पहिला विजय मिळवला

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**आयपीएल २०२३च्या २८व्या सामन्यात आज दिल्ली कॅपिटल्सचा सामना कोलकाता नाईट रायडर्सशी संपन्न झाला. हा सामना दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर खेळला जात होता. डबल हेडर सामन्यातील दुसऱ्या सामन्यात दिल्लीने कोलकाताच्या फलंदाजांची बत्ती करत आयपीएल हंगामातील पहिला विजय नोंदवला. कोलकाता नाईट रायडर्सने अवघे १२७ धावा करत १२८ धावांचे आव्हान ठेवले आहे त्याचा पाठलाग करताना दिल्लीने चार विकेट्सने हा सामना जिंकला.**

आधीच दिल्लीचा संघ अतिशय खराब फॉर्ममध्ये जात असून आतापर्यंतचे पाचही सामने त्यांनी गमावले होते. मात्र आजच्या सहाव्या सामन्यात त्यांनी शानदार कामगिरी करत संघाला रुळावर आणण्याचा प्रयत्न केला. धावांचा पाठलाग




करताना दिल्लीची सुरुवत फारशी चांगली झाली नाही. सलामीवीर पृथ्वी शॉने ११ चेंडूत १३ धावा करत चक्रवर्तीकरवी त्रिफळाचीत झाला. त्यानंतर आलेला अष्टपैलू मिचेल मार्श फारशी काही चांगली कामगिरी करू शकला नाही. त्याने ९ चेंडूत २ धावा केल्या. मागील काही सामन्यात जशी कर्णधार डेव्हिड वॉर्नरने एक बाजू लावून धरत फलंदाजी केली होती तशीच येथे केली.

त्याने ४१ चेंडूत ५७ धावा करत दमदार अर्धशतक झळकावले. मात्र चक्रवर्तीच्या फिरकी चेंडूवर पायचीत झाला. त्याने त्याच्या खेळीत ११ चौकार लगावले.

# फाफ डु प्लेसिसचा धमाका!

## विराट' खेळीमुळं पंजाबला विजयासाठी 175 धावांचं आव्हान






। हैदराबाद ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**आयपीएल २०२३च्या २८व्या सामन्यात आज दिल्ली कॅपिटल्सचा सामना कोलकाता नाईट रायडर्सशी संपन्न झाला. हा सामना दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर खेळला जात होता. डबल हेडर सामन्यातील दुसऱ्या सामन्यात दिल्लीने कोलकाताच्या फलंदाजांची बत्ती करत आयपीएल हंगामातील पहिला विजय नोंदवला.**

कोलकाता नाईट रायडर्सने अवघे १२७ धावा करत १२८ धावांचे आव्हान ठेवले आहे त्याचा पाठलाग करताना दिल्लीने चार विकेट्सने हा सामना जिंकला.पंजाबकडून फिरकीपटू राहुल चाहरने चार षटकांत २४ धावा दिल्या. पण राहुलला एकही विकेट मिळवण्यात यश आलं नाही. सॅम करनच्या गोलंदाजीवर फाफ ६८ धावांवर खेळत असताना उंच झेल उडाला होता. परंतु, पंजाबचा विकेटकीपर जितेश शर्माने झेल सोडला आणि फाफला जीवदान मिळालं. त्यानंतर हरप्रीत बरारच्या गोलंदाजीवर आरसीबीला पहिला धक्का बसला. विराट कोहली ५९ धावा करून बाद झाला. विराटने ४७ चेंडूत ५ चौकार आणि १ षटकार ठोकून ५९ धावांची खेळी साकारली.

विराट बाद झाल्यानंतर बरारच्या दुसऱ्या चेंडूवर ग्लेन मॅक्सवेल शून्यावर बाद झाला. बरारने एकाच षटकात आरसीबीला दोन धक्के दिले. त्यानंतर फाफने आक्रमक फलंदाजी करून धावांचा आलेख चढता ठेवला. परंतु, नेथन एलिसच्या गोलंदाजीवर फाफ ८४ धावांवर झेलबाद झाला. फाफने ५६ चेंडूत ८४ धावांची वादळी खेळी केली. यामध्ये पाच चौकार आणि पाच षटकारांचा समावेश आहे.